# नव्या बदलांचे दर्शन !

स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळून आता १५ वर्षे झाली. सत्तेचे विकेंद्रीकरण करून, समाजातील अधिकाधिक तळाच्या स्तरापर्यंत 'लोकशाही प्रक्रिया' पोहोचविणे आणि या स्तराला त्यात सहभागी करून घेणे हेच यामागील उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट प्रत्यक्षात यावे, निर्भीडपणे आणि अधिक सकसपणे त्यात महिलांचा सहभाग वाढावा याकरिता महिला राजसत्ता आंदोलन महाराष्ट्रात सातत्याने प्रयत्नरत


● नीला लिमये
● प्रफुल्ल शिंदे


आहे. अमरावतीत अलीकडे संपन्न झालेल्या महिला नेत्यांच्या अधिवेशनाने गावोगावच्या महिला नेत्या किती सजग झाल्या आहेत, हे दाखवून दिले.

'वोट हमारा राज हमारा- लेके रहेंगे, लेके रहेंगे', 'सावित्री घरोघरी- जोतिबांचा शोध जारी'- अशा घोषणांच्या निनादात आणि महिला चळवळीतील विविध गीते गात, अमरावती शहरात महिला राजसत्ता आंदोलनाचे पाचवे अधिवेशन संपन्न झाले.

ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांत निवडून गेलेल्या महिला, तसेच राजकारणात स्त्रियांनी सक्रियपणे काम केले पाहिजे, असे मानणाऱ्या कार्यकर्त्यांनी मिळून हे 'महिला राजसत्ता आंदोलन' उभे केले आहे. आर.एस.सी.डी. (रिसोर्स अँण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट) या संस्थेने त्यांना आर्थिक पाठबळ दिले आहे. २९-३० मार्च २००९ रोजी अमरावतीला झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात राजकारणात असणाऱ्या व राजकारण समजून घेऊ इच्छिणाऱ्या कष्टकरी, ग्रामीण महिला सहभागी झाल्या होत्या.

स्थानिक राजसत्तेत महिलांचा परिणामकारक सहभाग असेल, विविध विकासकार्यात त्या योगदान देतील, त्यांच्या अशा सहभागानेच परस्परावलंबी, न्याय व समानतेवर आधारित समाज निर्माण होऊ शकेल, याकरिता ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या आणि नेतृत्वशील महिलांचे सक्षमीकरण करणे, त्यांच्या क्षमता वाढविणे, परस्परसंबंधांचे जाळे तयार करणे, या ध्येयाने हे कार्य सुरू आहे.



या मिशनपर्यंत पोहोचण्याकरिता राजकारणातील सजग महिलांनी आता आपल्या डोळ्यासमोर काही उद्दिष्टे निश्चित केलेली दिसतात. त्या म्हणतात की, जमीन आणि घरांवर महिला व पुरुष यांची संयुक्त मालकी असायला पाहिजे. केवळ 'शासननिर्णय' काढून काही उपयोग होत नाही, शासनकर्त्यांची तीव्र इच्छा असायला हवी; त्यासाठी महिलांनी प्रयत्नशील असावे. ग्रामसभेला निर्णयाचे अधिकार देऊन, स्वतंत्र महिला ग्रामसभेच्या निर्णयास अंमलबजावणीसाठी प्रयत्न व्हायला हवे. नैसर्गिक साधनांवरचा हक्क निर्माण करणे; महिलांच्या राजसत्तेतील सक्षमीकरणासाठी आरक्षण, प्रशिक्षण व संरक्षण असावे यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे; ग्रामपंचायतीचा प्रत्येक सदस्य जागरूक, प्रश्नकर्ता व कृतिशील करून 'गावसंघटना' भविष्यकाळात स्वावलंबी, स्वायत्त व लढाऊ व्हावी यासाठी प्रयत्न करणे- असे अनेक ठराव या राज्यस्तरीय अधिवेशनात केले गेले.

अकोल्याच्या जिल्हा परिषद अध्यक्षा सादिया अंजुम यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन झाले. त्या म्हणाल्या 'मैं चुनाव लडुंगी ऐसा मैने कभी सोचा नही था। लेकीन मौका मिला। मैं चुनकर आयी और आज जिल्हा परिषदकी अध्यक्षा भी बन गयी।' अल्पसंख्याक समाजातील महिलांनीही राजकारणात भाग घेतला पाहिजे, मागे-

(पान ६ पाहा)

## आंदोलनाचे ठराव

१. विधिमंडळ व संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळालेच पाहिजे.

२. पंचायतराज व्यवस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण मिळालेच पाहिजे.

३. महिला सरपंचांना मोफत एसटी पासेस मिळाले पाहिजेत.

४. पंचायतराज महिला लोकप्रतिनिधी संरक्षण अधिनियम त्वरित पारित झाला पाहिजे.

५. गाव तिथे महिला भवन व तालुका तिथे सरपंच भवन असलेच पाहिजे.

६. विकेंद्रित पंचायतराज व्यवस्थेसाठी ११ वे परिशिष्ट हस्तांतरित झालेच पाहिजे.

७. महिला व वंचितांसाठी पंचायतराजमधील आरक्षित निधीच्या सुयोग्य वापरासाठी मार्गदर्शिका करण्यात यावी.

८. ग्रामसभा व महिला ग्रामसभांना वैधानिक दर्जा प्रदान करण्यात यावा व त्यासाठी आर्थिक निधीची तरतूद करण्यात यावी.

९. महिला सरपंचांना बैठक-भत्ता व मानधन केरळ पॅटर्नच्या आधारे निर्धारित करण्यात यावे.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक बळकटीसाठी महाराष्ट्र वित्त आयोग कार्यरत केला पाहिजे.

११. शासनाने 'दारूमुक्त महाराष्ट्र- अत्याचारमुक्त महाराष्ट्र' योजनेची घोषणा करावी.


